# कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्या.लि.



## आमच्याविषयी

### १) विभागाबद्दल संक्षिप्त माहिती

महाराष्ट्र शासनाच्या मराठी चित्रपटसृष्टीस प्रोत्साहन देण्याच्या धोरणानुसार कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाची सन १९८५ मध्ये स्थापना करण्यात आली असूनकोल्हापूर येथे चित्रनगरी विकसित करणेकरीता महाराष्ट्र शासनाने मौजे मोरेवाडी, ता. करवीर, जिल्हा कोल्हापूर येथीला सि.स.नं. ६४/१, ६५ मधील एकुण ७८ एकर जागा महामंडळास हस्तांतरीत केलेली आहे. सदरहू चित्रनगरी कोल्हापूर शहरालगत पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पासून १ कि.मी. अंतरावर वसलेली आहे.

कोल्हापूर चित्रनगरी येथे महामंडळाने टप्पा- १ अंतर्गत पाटीलवाडा व स्टुडिओ सन १९८५ मध्ये बांधलेला असून सन २०१७ मध्ये त्यांचे विस्तारीकरण करण्यात आले त्यामुळे सदर ठिकाणी पोलीस स्टेशन, दवाखाना, कोर्ड, कॅफेटेरीया अशी एकूण १८ चित्रिकरणस्थळे उपलब्ध झाली आहेत. या चित्रनगरीमध्ये महामंडळाने टप्पा- २ अंतर्गत सन २०१७ मध्ये ४.०० कि.मी. लांबीचे अंतर्गत रस्ते, पथदिवे, सुलभ शौचालय, बस स्टॉप तसेच टप्पा- ३ अंतर्गत सन २०२१ मध्ये ९० x १०० फूट आकाराचा व ४५ फुट उंचीचा टॉक शो स्टुडिओ, ६ मेकअप रूम, १२०० चौ.फूटचे गोडावून इ. पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या आहेत. चित्रिकरणाकरीता होत असलेली वाढती मागणी विचारात घेऊन टप्पा- ४ मध्ये ९० x १०० फूट आकाराचा व ४५ फूट उंचीचा टॉक शो स्टुडिओ तसेच १०० x १५० फूट आकाराचा ५५ फूट उंचीचा मॅजीक स्टुडिओ, वाडा, चाळ, रेल्वे स्टेशन, मंदिर व तंत्रज्ञ व कलाकरांकरीता २० खोल्यांचे वसतीगृह बांधण्याचे नियोजन करण्यात आले असून त्याकरीता एकूण रू. १५.०० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

कोल्हापूर चित्रनगरी येथे सन २०२० - २०२१ मध्ये स्टार प्रवाह या मराठी दूरदर्शन वाहिनीच्या " प्रेमाचा गेम सेम टू सेम " व " दख्खनचा राजा जोतीबा " तसेच स्टार प्लस या हिंदी दूरदर्शन वाहिनीच्या " मेहंदी है रचनेवाली " या मालिकेचे चित्रिकरण झाले असून सद्या या ठिकाणी " संत गजानन शेगावीचे " या सन टि.व्ही. वरील मराठी मालिकेचे चित्रिकरण सुरू आहे.

चित्रनगरीमधील विविध कामांचे नियोजन करणे, त्यांचे नकाशे व अंदाजपत्रक तयार करणे या करीता महांडळाने संचालक मंडळाच्या मान्यतेने वास्तुविशारदाची नेमणूक केलेली आहे. तसेच विविध कामांच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी देणे, निविदा मंजुरीबाबत अभिप्राय देणे व कामाचे दैनंदिन सर्वेक्षण करणे इ. करीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाबरोबर ५ वर्षे कालावधीकरीता करार केला आहे.

हे कार्यालय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग या प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, ४ था मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई येथे कार्यरत आहे.

## २) **कार्यासने व विषय :-**

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी | कार्यासन | विषय |
|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापकीय संचालक | विभाग प्रमुख | कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाचे नियंत्रक अधिकारी व विभाग प्रमुख म्हणून असणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या |
| २ | प्रकल्प व्यवस्थापक | अभियांत्रिकी (ठोक मानधनावर) | अर्थसंकल्पीय अंदाज, कार्यक्रम, अंदाजपत्रक तयार करणे व विविध कामांचे सर्वेक्षण करणे, देखभाल व दुरूस्ती कामे तसेच अभियांत्रिकी विषयी सर्व कामे. |
| ३ | लि.टंकलेखक | कंत्राटी पद्धतीने | अर्जदारांना प्रदानाची पावती देणे, रोख नोंदवही अद्ययावत ठेवणे, देयके तयार करणे, देयकाचा व केलेल्या खर्चाचा ताळमेळ ठेवणे, शुल्कान्वये जमा झालेली रक्कम तसेच GST चलनाद्वारे बँकेत भरणे, बँकेत भरलेल्या रकमांचा ताळमेळ ठेवणे, पोस्टाने पाठविण्यासाठी पाकिटे तयार करणे व त्याची जावक/आवक नोंदवहीत नोंद घेणे, केलेल्या पत्रव्यवहाराची जावक/आवक नोंदवहीत नोंद घेणे, कार्यालयातील सर्व शासकीय दस्तावेज सुरक्षित व अद्ययावत ठेवणे इ. नेमुन दिलेली इतर कामे, टंकलेखकाची इतर कामे. |
| ४. | सुरक्षा रक्षक | कंत्राटी पद्धतीने | कोल्हापूर चित्रनगरी येथे कार्यरत |

३) **अर्थसंकल्प** :-

| अ.क्र. | मुख्य लेखाशिर्ष | लेखाशिर्ष तपशिल | अर्थसंकल्पीय तरतूद (२०२१ - २०२२) (रूपये हजारात) |
|---|---|---|---|
| १ | २२०९३३६८(०५) कोल्हापूर चित्रनगरी महामंडळास व्यवस्थापन अनुदान | कोल्हापूर चित्रनगरी महामंडळास व्यवस्थापन अनुदान | ४०,०००/- |
| २ | ४२०२०७८५(०२) कोल्हापूर चित्रनगरी महामंडळास भागभांडवली अंशदान | कोल्हापूर चित्रनगरी महामंडळास भागभांडवली अंशदान | ४,००,०००/- |

४) **माहिती अधिकार** :-

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्या. लि.
पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,
४ था मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई- ४०००२८

केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(१) व ५(२) नुसार सहायक जन माहिती अधिकारी /जन माहिती अधिकारी / अपिलीय अधिकारी यांचे पदनिर्देशन

| कार्यालयाचे नाव | सहायक जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कार्यालयील पत्ता | कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक | प्रथम अपीलीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कार्यालयीन पत्ता | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्या.लि. | श्री. दिलिप भांदिगरे व्यवस्थापक | --- | पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, ४ था मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई- ४०००२८ | --- | श्री. संजय कृष्णाजी पाटील, व्यवस्थापकीय संचालक | पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, ४ था मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई- ४०००२८ | ९९३०७७२८९९ |

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाने प्रसिद्ध केलेली नागरीकाची सनद

परिशिष्ट ३ (अ)

## महामंडळाची रचना

संचालक मंडळ

**अशासकीय**

- मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य विभाग तथा अध्यक्ष
- मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य विभाग तथा उपाध्यक्ष
- शासन मान्यतेने नेमणूक सदस्य

**शासकीय**

- सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
- संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.
- व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाने प्रसिद्ध केलेली नागरीकाची सनद

परिशिष्ट ३ (ब)

## कार्यासन निहाय विषय सुची

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी | कार्यासन | विषय |
|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापकीय संचालक | विभाग प्रमुख | कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाचे नियंत्रक अधिकारी व विभाग प्रमुख म्हणून असणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या |
| २ | प्रकल्प व्यवस्थापक | अभियांत्रिकी (ठोक मानधनावर) | अर्थसंकल्पीय अंदाज, कार्यक्रम, अंदाजपत्रक तयार करणे व विविध कामांचे सर्वेक्षण करणे, देखभाल व दुरूस्ती कामे तसेच अभियांत्रिकी विषयी सर्व कामे. |
| ३ | लि.टंकलेखक | कंत्राटी पद्धतीने | अर्जदारांना प्रदानाची पावती देणे, रोख नोंदवही अद्ययावत ठेवणे, देयके तयार करणे, देयकाचा व केलेल्या खर्चाचा ताळमेळ ठेवणे, शुल्कान्वये जमा झालेली रक्कम तसेच GST चलनाद्वारे बँकेत भरणे, बँकेत भरलेल्या रकमांचा ताळमेळ ठेवणे, पोस्टाने पाठविण्यासाठी पाकिटे तयार करणे व त्याची जावक/आवक नोंदवहीत नोंद घेणे, केलेल्या पत्रव्यवहाराची जावक/आवक नोंदवहीत नोंद घेणे, कार्यालयातील सर्व शासकीय दस्तावेज सुरक्षित व अद्ययावत ठेवणे इ. नेमुन दिलेली इतर कामे, टंकलेखकाची इतर कामे. |
| ४. | सुरक्षा रक्षक | कंत्राटी पद्धतीने | कोल्हापूर चित्रनगरी येथे कार्यरत |

# <u>माहितीचा अधिकार</u>

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्या. लि.
पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,
४ था मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई- ४०००२८

केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(१) व ५(२) नुसार सहायक जन माहिती अधिकारी /जन माहिती अधिकारी / अपिलीय अधिकारी यांचे पदनिर्देशन

| कार्यालयाचे नाव | सहायक जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कार्यालयील पत्ता | कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक | प्रथम अपीलीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कार्यालयीन पत्ता | कार्यालयीन दूरध्वनी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्या.लि. | श्री. दिलिप भांदिगरे व्यवस्थापक | --- | पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, ४ था मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२८ | --- | श्री. संजय कृष्णाजी पाटील, व्यवस्थापकीय संचालक | पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, ४ था मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२८ | ९९३०७७२८९९ |

संपर्क

| | |
|---|---|
| व्यवस्थापकीय संचालक | श्री. संजय कृष्णाजी पाटील |
| भ्रमणध्वनी | ९९२०७७२८९९ |